**स्व. राजकमलजी भारती कला. वाणिज्य व श्रीमती सुशीलाबाई राजकमलजी भारती विज्ञान महाविद्यालय, आर्णी**

# राष्ट्रीय सेवा योजना

## नियमित कार्यक्रम अहवाल सत्र २०२२-२३

1. **रोजगार कार्ड शिबीर १३-०४-२०२२:** स्व. राजकमलजी भारती कला, वाणिज्य व श्रीमती सुशीलाबाई राजकमलजी भारती विज्ञान महाविद्यालय, आर्णी येथे रोजगार कार्ड शिबीर घेण्यात आले. यावेळी जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र यवतमाळ येथील कर्मचारी श्रीमती सोनल म्हात्रे, श्री विशाल मनोहर, श्री योगेश काकडे, श्रीमती सुचिता घाडगे हे आले होते. त्यांनी विध्यार्थाना रोजगार नोंदणीबाबत माहिती दिली. रोजगार पोर्टल कसे वापरायचे ह्याचे प्रात्यक्षिक करून दाखविले. त्यानंतर विद्यार्थ्यांचे रोजगार कार्ड काढून दिले.
2. **सायकल रॅली व पर्यावरण जागृती १९-०४-२०२२:** स्वयंसेवकांनी माजी वसुंधरा अभियान अंतर्गत पर्यावरण जनजागृती सायकल रॅली काढण्यात आली या रॅलीत महाविद्यालयाचे विद्यार्थी व राष्ट्रीय स्वयंसेवक यांनी सहभाग घेतला.
3. **सायबर सिक्युरिटी प्रोग्राम 4 मे 2022:** या कार्यक्रमात प्रा. मुजमुले सर यांनी विध्यार्थाना इंटरनेट वापरताना घ्यावयाची काळजी व ऑनलाईन कसे फसविल्या जाते आणि ते कसे टाळता येईल याची माहिती दिली.
4. **स्वच्छता अभियान ०६ ते १३-०६-२०२२:** या सप्ताहात विद्यार्थ्यांनी आपापल्या राहत्या गावी सार्वजनिक ठिकाणी जाऊन स्वच्छता केली.
5. **शिवराज्य दिन ०६ जून 2022:** स्व. राजकमलजी भारती कला, वाणिज्य व श्रीमती सुशीलाबाई राजकमलजी भारती विज्ञान महाविद्यालय, आर्णी येथे महाराष्ट्राचं दैवत असलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेकदिन स्वराज्य दिन म्हणून साजरा करण्यात आला. शिवराज्य दिनानिमित्त शिवाजी महाराज यांचावर आधारित क्विझ कॉम्पिटिशन घेतली
6. **आंतरराष्ट्रीय योग दिन - २१ जून २०२२**: राष्ट्रीय सेवा स्व. राजकमलजी भारती कला, वाणिज्य व श्रीमती सुशिलाबाई रा. भारती विज्ञान महाविद्यालय आर्णी आंतरराष्ट्रीय योग दिवस २१ जुन २०२२ ला सकाळी ७.०० वाजता साजरा करण्यात आला. यामध्ये प्रा. एस. बी. चोरडीया यांनी महाविद्यालयाच्या पटांगणात योगासने, प्राणायम प्रात्यक्षिके करून घेतले. त्यांनी योग करा, निरोगी,सुदृढ शरीर आणि शांत मन याची एकच गुरूकिल्ली आहे ती म्हणजे योग. निर्धार करा की मी रोज योगा करेल निरोगी आयुष्य ठेवण्याचा हा मंत्र नेहमी जपा. संपूर्ण जगाला आनंदित करू चला योगाकडे वळू. योगा करण्याचा नियमित सराव करूया आपले जीवन आनंदी आणि निरोगी करूया. तसेच त्यांनी प्रत्येक

योगासने कशी करायची व त्यांचे फायदे काय आहेत हे सांगितले. याप्रसंगी विद्यार्थांनी प्रा. चोरडिया यांना योगासनाबद्दल प्रश्न विचारले. विचारलेल्या प्रश्नाचे प्रा. चोरडिया सरांनी उत्तरे देवुन समाधान केलेया कार्यक्रमाला महाविद्यालयाचे प्राचार्य एन. ए. पिस्तुलकर व इतर प्रध्यापक वृंद व शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.

7. **शाहू महाराज जयंती 26 जून 2022:** यावेळी महाविद्यालयामध्ये शाहू महाराज जयंती साजरी करण्यात आली या प्रसंगी मार्गदर्शक विद्यार्थी व कर्मचारी उपस्थित होते.

8. **वसंतराव नाईक जयंती १ जुलै 2022:** या दिवशी महाविद्यालयामध्ये भारत हरित क्रांतीचे जनक स्वर्गीय वसंतराव नाईक यांची जयंती साजरी करण्यात आली.

9. 1 **ऑगस्ट** 2022 रोजी अण्णाभाऊ साठे यांची जयंती व लोकमान्य टिळक यांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली.

10. **Covid-19 लसीकरण शिबीर:** स्व. राजकमलजी भारती कला, वाणिज्य व श्रीमती सुशिलाबाई रा. भारती विज्ञान महाविद्यालय, आर्णी येथे दिनांक २ ऑगस्ट २०२२ रोजी सकाळी ९.०० वाजता पासुन कोविड-१९ लसीकरण शिबिर घेण्यात आले. यामध्ये विद्यार्थ्यांचे व महाविद्यालयाच्या कर्मचारी वृंदांचे लसीकरण करण्यात आले. त्या अंतर्गत co-vaxin आणि covidshield याचा पहिला, दुसरा व बूस्टरडोज लाभार्थ्यांना देण्यात आला. या लसीकरण शिबिराचा एकूण ७५ लोकांनी लाभ घेतला. या लसीकरण शिबिराचे आयोजन भारती महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना व ग्रामीण रुग्णालय, आर्णी यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले. या शिबिराचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डॉ. एन. ए. पिस्तुलकर यांनी केले व प्रमुख पाहुणे म्हणुन महाविद्यालयाचे ग्रंथालय विभागप्रमुख प्रा. डॉ. एस. व्ही. वानखडे उपस्थित होते. या लसीकरण शिबरीत ग्रामीण रुग्णालय, आर्णीच्या लसीकरण विभागाचे शंकर टोपे, सुरेश चौधरी, अनिता ढोले, स्मिता कांबळे यांनी लसीकरण केले. या वेळी रा. से. यो. स्वयंसेवक संकेत हरसुलकर व महाविद्यालयाचे शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

11. **स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव (हर घर झेंडा)- ०९ ते १७ ऑगस्ट २०२२:** स्व. राजकमलजी भारती कला, वाणिज्य व श्रीमती सुशिलाबाई रा. भारती विज्ञान महाविद्यालय, आर्णी येथे दिनांक ९ ऑगस्ट ते १७ ऑगस्ट २०२२ या दरम्यान स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करण्यात आला. यामध्ये महाविद्यालयात विविध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले तसेच विविध उपक्रमांद्वारे हर घर झेंडा मोहिमे अंतर्गत जनजागृती करण्यात आली. महाविद्यालयात दिनांक ९ ऑगस्ट रोजी क्रंतिदिवस साजरा करण्यात आला. १२ ऑगस्ट रोजी रक्षाबंधनाचे औचित्य साधून वृक्षांना राखी बांधून वृक्षांचे संवर्धन व रक्षण करण्याचा संकल्प करण्यात

आला. यानंतर दिनांक १३ ऑगस्ट रोजी महाविद्यालयाने आर्णी शहरात झेंडा रॅली काढण्यात आली व लोकांना हर घर झेंडा लावण्याचे आवाहन करण्यात आले. यानंतर राष्ट्रीय सेवा योजना पथकाद्वारे दत्तक ग्राम तेंडोळी येथे रॅली काढून राष्ट्रीय ध्वजाचे महत्त्व सांगून आपल्या घरी राष्ट्रध्वज उभारण्यास प्रेरित करण्यात आले. दिनांक १३ ते १५ ऑगस्ट दरम्यान महाविद्यालयामध्ये ध्वजारोहण करण्यात आले. दिनांक १७ ऑगस्ट रोजी प्रादेशिक वनीकरण विभाग आर्णी व भारती महाविद्यालयाच्या रा. से. यो. पथक यांच्या संयुक्त विद्यमाने वृक्षलागवड करण्यात आली तसेच महाविद्यालयामध्ये निबंध स्पर्धा, चित्रकला स्पर्धा आणि वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन केले. या स्पर्धेला विद्यार्थ्यांचा भरघोस प्रतिसाद मिळाला. या कार्यक्रमाच्या समारोपीय कार्यक्रमात विजेत्यांना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एन. ए. पिस्तुलकर व श्री दत्त प्रासादिक शिक्षण प्रसारक मंडळ,आर्णी चे संचालक डॉ. एस. व्ही. वानखडे यांच्या हस्ते बक्षीस देण्यात आले . या नंतर ठीक ११:०० वाजता महाविद्यालयाच्या प्रांगणात राष्ट्रगीताचे सामुहिक गायन करण्यात आले.हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शारिरीक शिक्षण विभागाचे प्रा. एस. बी. चोरडिया, सांस्कृतिक विभाग आणि राष्ट्रीय सेवा योजना व महाविद्यालयाचे शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी,महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

12. **२२ ऑगस्ट २०२२:** या दिवशी ग्रामीण रुग्णालय आर्णीचे श्री. विशाल शेजव यांनी विध्यार्थाना शारीरिक आरोग्य आणि आजचा युवक यावर मार्गदर्शन केले.

13. **२3 ऑगस्ट २०२२:** या दिवशी महाविद्यालयात तहसील आर्णी याच्या संयुक्त विद्यमाने विद्यार्थांसाठी मतदान नोंदणी शिबीर घेण्यात आले. ज्यांना १८ वर्षे पूर्ण जाळीत त्यांची नोंदणी करण्यात आली.

14. **२४ सप्टेंबर २०२२**: महाविद्यालयात दि. २४ सप्टेंबर २०२२ ला राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिन साजरा करण्यात आला. या प्रसंगी रा.स. यो. स्वयंसेवकांनी महाविद्यालयाच्या परिसरात साफसफाई करण्यात आली.या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एन. ए. पीस्तुलकर, , प्रमुख अतिथि म्हणून महाविद्यालयाचे ग्रंथालय प्रमुख, डॉ. एस. व्ही. वानखडे व प्रमुख वक्ते म्हणून डॉ. धनंजय देशमुख हे होते. या प्रसंगी डॉ. धनंजय देशमुख सर यांनी राष्ट्रीय सेवा योजनेचा जडणघडणीचा प्रवास तसेच उद्दिष्टे व जबाबदारी या बद्दल बहुमूल्य मार्गदर्शन केले.

15. **महात्मा गांधी**, **लाल बहादूर शास्त्री जयंती व स्वच्छता अभियान अहवाल- २ ऑक्टोबर २०२१**: महाविद्यालयात दि. २ ऑक्टोबर २०२१ ला राष्ट्रपिता महात्मा गांधी व लाल बहादूर शास्त्री यांची जयंती साजरी करण्यात आली. या प्रसंगी महाविद्यालयाचा परिसरात स्वच्छता करण्यात आली .

16. **राष्ट्रीय एकता दिन**: ३१ऑक्टोबर २०२२ ला सकाळी ९.००वाजताराष्ट्रीय एकता दिवस साजरा करण्यात आला.याप्रसंगी राष्ट्रीय एकात्मतेचे शिल्पकार सरदार वल्लभभाई पटेल जयंती साजरी करण्यात आली.

17. **संविधान दिन:** २६ नोव्हेंबर २०२२: महाविद्यालयात दि. २६ नोव्हेंबर २०२२ ला संविधान दिन साजरा करण्यात आला. या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एन. ए. पीस्तुलकर हे अध्यक्ष, प्रमुख अतिथि म्हणून महाविद्यालयाचे ग्रंथालय प्रमुख, डॉ. एस. व्ही. वानखडे व प्रमुख वक्ते म्हणून डॉ. धनंजय देशमुख तसेच सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. एम. एम. पांडे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरवातीला भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करण्यात आले. या कार्यक्रमात प्रमुख मागदर्शन करताना प्रा. डॉ. धनंजय देशमुख यांनी संविधान दिनाचा इतिहास आणि संविधान तयार करताना भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे बहुमूल्य योगदान तसेच संविधानाबद्दल संपुर्ण रचना याबद्दल माहिती दिली.

18. **महापरिनिर्वाण दिन ;** ६ डिसेंबर २०२२: महाविद्यालयात महापरिनिर्वाण दिन साजरा करण्यात आला. यावेळी सुनील सुखदेवे सर यांनी भारताचे संविधान आणि युवक यावर मार्गदर्शन केले.

19. **९ डिसेंबर २०२२:** महाविद्यालयात ग्रामीण रुग्णालय आर्णीचे श्री. विशाल शेजव यांनी HIV-AIDS यावर मार्गदर्शन केले.

**20.** **श्रमदान**: **-**भारती विज्ञान महाविद्यालय**,** आर्णी येथे दिनांक **१७-१२-२०२२** रोजी सकाळी ०९:०० वाजता राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे स्वच्छता अभियान राबविण्यात आले या अंतर्गत राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांनी महाविदलयाचा परिसर स्वच्छ केला. तसेच महाविदलयातील उद्यान मधील काडी कचरा व गवत काढून श्रमदान केले.

**21.** **२० डिसेंबर २०२२:** महाविद्यालयात गाडगेबाबा यांची ६६ वी पुण्यतिथी साजरी करण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. निवृत्ती पिस्तुलकर यांचे हस्ते संत गाडगेबाबा यांच्या फोटोच्या प्रतिमेचे पूजन व हारार्पण केले. त्यानंतर कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. पी. एन. सोनोनो यांनी केले त्यानंतर प्रा. एस. एम. आराडे संत गाडगे बाबा यांच्या जीवनचरित्राबद्दल माहिती दिली.

**22.** **२५ जानेवारी २०२३:** ला मतदान दीन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे शारीरिक शिक्षण संचालक प्रा. एस. बी. चोरडीया, प्रमुख पाहुणे म्हणुन प्रा. यू डी.चव्हाण व वक्ते डॉ. एस. बी. शेलकर हे होते. या कार्यक्रमात मार्गदर्शन करताना प्रा. बी. एस. शेलकर सर यांनी मतदान आयोग, त्यांची कामे व अधिकार यावर प्रकाश टाकला आणि आपल्याला निवडणूक आयोगाने

दिलेला अधिकाराचे महत्त्व , कर्तव्य यावर मार्गदर्शन केले. अध्यक्षिय भाषण करताना चोरडिया सर यांनी युवकांना मतदान नोंदणी करून मतदान करण्याचे आव्हाहन केले. यावेळी सुशील अडाने याने मतदानाचे महत्त्व यावर भाषण केले. या कार्यक्रमात मुक्त, निःपक्षपाती व शांततापूर्ण वातावरणात मतदान करण्याची शपथ घेण्यात आली. लोकशाही पंधरवडा साजरा करण्यासाठी महाविद्यालयात मतदान जनजागृती वर आधारित निबंध स्पर्धा, वकृत्व स्पर्धा, मार्गदर्शन व मतदान नोंदणी चे शिबिराचे इत्यादीचे आयोजन प्राचार्य डॉ. एन. ए. पिस्तुलकर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आलेले आहे.

**23.** **२५ जानेवारी २०२३:** रोजी सकाळी ०९:०० वाजता राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे स्वच्छता अभियान राबविण्यात आले या अंतर्गत राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांनी महाविदलयाचा परिसर स्वच्छ केला.

24. **संत गाडगेबाबा जयंती**: **-२३फेब्रुवारी२०२३**: महाविद्यालयात संत गाडगेबाबा जयंती साजरी करण्यात आली. याप्रसंगी .रुपाली टेकाडेयांनी संत गाडगेबाबा यांच्या जीवन चरित्राबद्दल माहिती दिली.तसेच राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांनी महाविदयालयाचा परिसर स्वचछ केला.

25. **३० मार्च २०२३:** रोजी सकाळी ०९:०० वाजता राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे स्वच्छता अभियान राबविण्यात आले या अंतर्गत राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांनी महाविदलयाचा परिसर स्वच्छ केला**.**